लगने की चर्चा है। बता दें कि खरीफ नुकसान हुआ।

शेष | पेज 16 पर

# नक्सल समर्थक है सत्यशोधन समिति

## » पत्र परिषद में भारतीय मानवाधिकार परिषद ने लगाया आरोप

ब्यूरो | गढ़चिरोली

भामरागढ़ तहसील के कसनासुर-बोरिया में हुई मुठभेड़ के बाद सत्यशोधन के नाम पर घटनास्थल पर पहुंची 12 राज्यों के प्रतिनिधियों की समिति नक्सल समर्थक है। समिति द्वारा पुलिस विभाग पर लगाए गए आरोप बेबुनियाद होकर घटना में लापता बताए गए गट्टेपल्ली के 8 नागरिक भी नक्सल समर्थक ही हैं। इस आशय के आरोप मंगलवार को आयोजित पत्र परिषद में भारतीय मानवाधिकार परिषद के प्रदेश अध्यक्ष गजेंद्र डोमले ने लगाए।

उन्होंने बताया कि, भारतीय मानवाधिकार परिषद के वरिष्ठ पदाधिकारियों के निर्देशों का पालन करते हुए परिषद की एक समिति रविवार को मौके पर पहुंची। इस समय कसनासुर और बोरिया के ग्रामीणों के साथ चर्चा की गई। गट्टेपल्ली के 8 नागरिक लापता बताए गए हैं, जो इसी मुठभेड़ में मारे गए। उपरोक्त आठों नागरिक नक्सली कमांडर साईंनाथ को भोजन पहुंचाने समेत उसके अन्य कार्य किया करते थे। वे आमजन होकर नक्सल समर्थक थे। घटना वाले दिन वे भी नक्सलियों के साथ मौके पर खड़े थे। पुलिस व नक्सलियों के बीच हुई मुठभेड़ में उनकी जान गई। इस घटना पर परदा डालते हुए सत्यशोधन टीम ने पुलिस पर गंभीर आरोप लगाते हुए लोगों की हत्या किए जाने का बेबाक बयान दिया है।

शेष | पेज 16 पर





पत्रपरिषदेला उपस्थित गजेंद्र डोमळे, पुरुषोत्तम ठाकरे, शशीकांत मोकासे, विलास झोडगे, मंगेश कामडी, रेवती रेभनकर, दिनेश चुधरी, माधवी कुळमेथे व नक्षलपीडित सदस्य

# कसनासूरची चकमक ही सत्य घटना

## असामाजिक संघटनांकडून चुकीचा माहिती पसरविण्याचा प्रयत्न

## भारतीय मानवाधिकार परिषद व नक्षलपीडित संघटनेची माहिती

**गडचिरोली, ८ मे**

भामरागड तालुक्यातील ताडगाव हद्दीतील कसनासूर-बोरिया जंगलात पोलिस व नक्षलवाद्यांमध्ये झालेली चकमक ही सत्य घटना असून त्यात मारले गेलेले लोक नक्षलवादी व समर्थकच आहेत. मात्र असामाजिक संघटना ही खोटी चकमक असल्याची चुकीची माहिती पसरविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे भारतीय मानवाधिकार परिषद व नक्षलपीडित संघटनेने मंगळवार, ८ मे रोजी येथे आयोजित पत्रपरिषदेत सांगितले आहे.

या पत्रपरिषदेला भारतीय मानवाधिकार परिषदेचे प्रदेश अध्यक्ष गजेंद्र डोमळे, प्रदेश निरीक्षक पुरुषोत्तम ठाकरे, विभागीय अध्यक्ष शशीकांत मोकासे, विलास झोडगे, मंगेश कामडी, निखिल सुंदरकर, रेवती रेभनकर, दिनेश चुधरी, माधवी कुळमेथे, संजय रामटेके व नक्षलपीडित संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

आजवर नक्षलवाद्यांनी जवळपास ५०८ निरपराध लोकांची हत्या केली. मात्र या घटनानंतरही एकदाही मानवाधिकार सत्यशोधन समितीचे सदस्य घटनास्थळी किंवा त्या गावात आले नाही आणि त्यांनी कुणालाही मानवाधिकार मिळवून दिला नाही. केवळ नक्षलवादी व समर्थक मारले गेल्यानंतरच या समितीच्या संघटना एकत्रित येतात आणि मानवाधिकाराचे हनन झाल्याचा मुद्दा उपस्थित करतात. त्यामुळे सत्यशोधन समितीमधील संघटनांचे काही सदस्य नक्षल समर्थक असल्याचा आरोपही भारतीय मानवाधिकार परिषदेने यावेळी केला आहे.

मानवाधिकार परिषदेचे सदस्य ६ मे रोजी घटनास्थळाची पाहणी केली व गावकऱ्यांशी संवाद साधला असता ही चकमक सत्य असून या घटनेत मारले गेलेले नक्षलवादी व त्यांच्या संपर्कात असलेले समर्थक असल्याची माहिती मिळाली. या घटनेच्या माहितीचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो राज्य मानवी आयोग व केंद्रीय मानवी आयोगाकडे पाठविण्यात येणार असल्याचेही पत्रपरिषदेत सांगितले. *(तभा वृत्तसेवा)*

## विजेच्या धक्क्याने दोन म्हशी ठार

